# उपविभागीय अधिकारी कार्यालय, इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी.

E-Mail-sdoichalkaranji@gmail.comm दुरध्वनी/फॅक्स क्र.२३०-२४३६७८७

क्र. भूसंपादन/एसआर/०१/२०१८ दिनांक. १९ /०१/२०१९

प्रति,

मे. व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय,
पुणे - ४११००६

**विषय:- भूसंपादन :- कोल्हापूर**
**एस.आर.** ०१/२०१८, **हुपरी,** ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर.

२/- वरील विषयाची न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आणि भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखणे अधिनियम २०१३ चे कलम १९ मधील जाहीरनामा ( दोन प्रतीत) या सोबत पाठविलेली आहे. कृपया, सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१ पुणे विभाग पुणे मध्ये प्रसिध्द करणेत यावी. व सदर छापील राजपत्राच्या १० प्रती या कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सत्वर पाठविणेस विनंती आहे.

**उपविभागीय अधिकारी**
**इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी**

**प्रत :-**

१ मा. व्यवस्थापक, एन.ओ.सी.जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
२/- कृपया, सदर अधिसूचना जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

२ मा. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर नवीन प्रशासकीय मध्यवर्ती इमारत, का ा बावडा, कोल्हापूर.
२/- कृपया, सोबत कलम १९ ची अधिसूचना (०५ प्रतीत) कोल्हापूर जिल्हयातील दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीकरिता देणेबददल विनंती आहे. व त्याचे जाहीरातीचे बील या कार्यालयाकडे पाठविणेबददल त्यांना सूचना देणेस विनंती आहे.

३ तहसिलदार हातकणंगले,
२/- सोबतची अधिसूचना एक प्रत आपले कार्यालयीन नोटीस बोर्डवर चिकटवून प्रसिध्द करणेत यावी व प्रसिध्दीचा अहवाल इकडे उलटटपाली बिनचूक पाठविणेत यावा. व वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी व दुरुस्त ७/१२ उतारे इकडे सादर करावेत.

४ गा.का.तलाठी हुपरी, ता. हातकणंगले
२/- सोबतची कलम १९ ची अधिसूचना एक प्रत गावचे चावडी बोर्डवर प्रसिध्द करणेत यावी व प्रसिध्दीचा अहवाल इकडे उलटटपाली बिनचूक पाठविणेत यावा. व वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी व दुरुस्त ७/१२ उतारे इकडे सादर करावेत.

५ मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर (कार्यासन ११) यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

६ मा. कार्यकारी अभियंता, दुधगंगा कालवे विभाग क्र. ०१, कोल्हापूर यांना माहितीसाठी.

**उपविभागीय अधिकारी**
**इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी**

# अधिसुचना (१९)

उपविभागीय अधिकारी,
इचलकरंजी विभाग, इचलकरंजी,
ता.हातकंणगले,जि.कोल्हापूर

क्र.भुसंपादन **एस.आर.क्रमांक.०१/२०१८** ज्या अर्थी समुचित शासन असलेल्या कोल्हापूर जिल्हयाच्या जिल्हयाधिकारी यांच्या मार्फत उपविभागीय अधिकारी,इचलकरंजी विभाग, इचलकरंजी, यांनी भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना ,क्रमांक **११ राजपत्र २२ ते २८ नोव्हेंबर २०१८ पान क्र.०८ ते १०** अन्वये प्रांरभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी ची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. तसेच ज्याअर्थि जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांनी दि.०१/११/२०१८ रोजी कलम ११ च्या अधिसुचनेस मान्यता प्रदान केलेली आहे.

आणि ज्याअर्थि **उपविभागीय अधिकारी,इचलकरंजी विभाग, इचलकरंजी**, यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांने आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यक आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिननीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थि, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी विभाग, इचलकरंजी, ता.हातकंणगले ,जि.कोल्हापूर यांस** (अधिसुचना काढण्यापूर्वी अधिका-यांचे नाव व पत्ता नमुद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

**संपादित करावयाचे जमिनीचे वर्णन**

गावाचे नांव- **मौजे हुपरी, ता हातकंणगले**, जि.कोल्हापूर

| अनुक्रमांक | भुमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टर आर ) | दिशा |
|---|---|---|---|
| १ | १७८८ पैकी | ०.८१.० | उत्तर पूर्व बाजू |
| | **एकूण** | **०.८१.०** | |

# अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

## गावाचे नांव- मौजे हुपरी, ता हातकंणगले, जि.कोल्हापूर

प्रकल्पाचे नांवः दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प, तालुका –राधानगरी, जिल्हा. कोल्हापूर

**प्रकल्पाचे कामाचे वर्णनः-** दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प ता.राधानगरी जि.कोल्हापूर हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत दुधगंगा नदीवर आसनगांव ता.राधानगरी येथील १२८० मी. लांबीची(मध्यभागी नदीपात्रात दगडी व दोन्ही तिरावर मातीचे असे संयुक्त) धरण आहे. दुधगंगा धरणाखालील दोन्ही तिरावर कालवे असून सदर कालव्याची लांबी उजवा तीर कालवा २४ कि.मी.व उजवा तीर कालव्याखालील बिद्री शाखा कालवा ४१ कि.मी., निढोरी शाखा कालवा २५ कि.मी., कूर शाखा कालवा १७ कि.मी.,डावा तीर कालवा ७६ कि.मी. डाव्या तीर कालव्याखालील कोल्हापूर शाखा कालवा ३८ किमी व कुरुंदवाड शाखा कालवा ४० कि.मी. इतकी आहे.

सदर धरणामध्ये ७१९.९२ दलघमी इतका पाणीसाठा होत असून त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील ६१०३२ हे.(पीकक्षेत्र) व कर्नाटक राज्यातील १२९८५ हे.(पीकक्षेत्र) क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. सदर प्रकल्पास तृतीय प्रशासकीय मान्यता रु.१७१२७९.९० लक्ष दिनांक १५ जुलै २०११ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. आतापर्यंत सदर प्रकल्पास रु.९९६६३.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पाची उर्वरित किंमत रु.७१६१६.९० लक्ष इतकी आहे.त्यामुळे सद्य:स्थितीत सदर प्रकल्पास अनुदान उपलब्ध आहे.

समाजाला होणारे लाभ :-

(अ) या प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये बारमाही पाण्याची सोय झाल्यामुळे नगदी पिके घेणे शक्य होवून लोकांचा आर्थिक व समाजिक स्तर विकसीत झाला असून दिवसोदिवस सदर विकास वाढतच आहे. तसेच या प्रकल्पामुळे लाभक्षेत्रातील गांवामध्ये पाणीटंचाई दूर झालेली आहे.

(ब) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पीक क्षेत्रामध्ये वाढ झालेली असून त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळालेला आहे.

(क) पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे विविध प्रकारची नगदी पिके घेणे शक्य होवून लाभक्षेत्रातील शेतक-यांचे आर्थिक राहणीमान सुधारल्यामुळे ते लोक सर्व नागरी सुविधा मिळविण्याबाबत सक्षम झालेले आहेत.

(ड) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये ऊसासारखी नगदी पिके घेतल्यामुळे साखर कारखान्यासारखा औद्यौगिक क्षेत्रामध्ये वाढ होवून विकास झालेला आहे.